ePaper

# भाजपाने टिळक कुटुंबाला वापरून फेकलं:उद्धव ठाकरे



वर्ष - 6 ।अंक - 309 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आदर्श आचारसहिंतेचे काठेकोरपणे पालन!
- आता रात्रीस खेळ चाले!
- भारताला आत्मविश्वास उंचावण्याची गरज!

www.mahaenews.com । शुक्रवार,दि. 24फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चिंचवडमध्ये ‘कमळ’ फुलणार!

## देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास : लक्षमणभाऊंची ताकद दाखवून देऊ

। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।

**भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या सरकारने पिंपरी-चिंचवडकरांसाठी नियमाच्या बाहेर जाऊन आंद्रा धरणातील २५० एमलडी पाणी मंजूर केले आहे. वाढणाऱ्या या शहराची गरज लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतला होता. हे पाणी हे पाणी लवकरच शहरापर्यंत पोहोचणार आहे. त्यातून या शहराची तहान भागवण्याचे काम निश्चितपणे पूर्ण केले जाणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी सांगवी येथील सभेत सांगितले.**



तसेच, पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने उमेदवार उभा केला नसता तर त्यांचा मोठेपणा दिसला असता. पण आता ठीक आहे, दिवंगत लक्ष्मणभाऊंची काय ताकद आहे? हे या निवडणुकीतून आम्ही दाखवून देऊ, असे आव्हान त्यांनी राष्ट्रवादीला दिले.

चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारार्थ सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, धनंजय महाडीक, भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार शिवेंद्रराजे भोसले, आमदार राम सातपुते, उमा खापरे, श्रीकांत भारतीय, राम शिंदे, गोपीचंद पडळकर, अभिमन्यू पवार, तुषार राठोड, प्रसाद लाड, माजी मंत्री विजय शिवतारे, हर्षवर्धन पाटील, माजी खासदार अमर साबळे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, माजी महापौर माई ढोरे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, प्रदेश सचिव अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, रासपचे शहराध्यक्ष भारत महानवर, प्रहारचे संजय गायके आदी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, “शहराच्या जडणघडणीत लक्ष्मण जगताप यांचा वाटा होता. ही निवडणूक आलीच नसती तर आपल्या सगळ्यांना आनंद झाला असता. परंतु, कधी कधी नियती आपल्यावर काही गोष्टी लादत असते. उमदा नेता, २४ तास विकासाची कास धरणारा, जनसामान्यांचा आवाज बनणारा नेता दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले. निवडणूक अचानक आली. कोणाचीही मानसिक तयारी नव्हती. त्यांचे कार्य समर्थपणे नेण्यासाठी त्यांच्या मागे सावलीप्रमाणे उभ्या राहिलेल्या अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षाने घेतला. दुःखाच्या काळातही लक्ष्मणभाऊंचे कार्य पुढे नेण्यासाठी त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या.यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार श्रीरंग बारणे, धनंजय महाडीक, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांचीही भाषणे झाली.

### शास्तीकराचा आदेश काढावाच लागेल...

शास्तीकर रद्द व्हावा यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. मोगलांच्या काळातील जिझिया करासारखा केवळ पिंपरी-चिंचवडकरांवर हा कर लावण्यात आला होता. लोकांना मोठ्या प्रमाणात नोटीस देण्यास सुरू केले होते. त्यावेळी काँग्रेस-राष्ट्रवादीचे शासन होते. त्यांना अचानक स्वप्न पडले आणि शहरात शास्तीकर लावला. पण भाजप-शिवसेना महायुती सरकारने एक हजार चौरस फुटांपर्यंतच्या घरांचा शास्तीकर रद्द केला. नंतर नवीन सरकार आल्यानंतर लक्षात आले की एवढ्याने नागरिकांची सुटका होत नाही. त्यामुळे शास्तीसारखा जिझिया कर संपूर्णपणे रद्द करण्याची घोषणा विधानसभेत केली आहे. त्याचा शासन आदेश काढला नाही, तर सरकारवर हक्कभंग येतो. त्यामुळे विधानसभेत केलेल्या घोषणेचा शासन आदेश काढावाच लागतो. केलेल्या घोषणेप्रमाणे नक्कीच शासन आदेश काढून शास्तीकर संपूर्णपणे रद्द करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

### मतदारांनी लक्ष्मणभाऊंना श्रद्धांजली वाहावी...

आता मतदारांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना आशिर्वाद देऊन लक्ष्मणभाऊंना श्रद्धांजली वाहावी. पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने उमेदवार उभा केला नसता, तर त्यांचा मोठेपणा दिसला असता. पण आता ठीक आहे, दिवंगत लक्ष्मणभाऊंची काय ताकद आहे हे या निवडणुकीतून आम्ही दाखवून देऊ. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने लक्ष्मणभाऊंच्या सावली असलेल्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांना अभूतपूर्व विजय देणार आहे. लक्ष्मणभाऊ म्हणायचे पिंपरी-चिंचवड शहरामध्ये आंतरराष्ट्रीय शहर बनण्याची ताकद आहे. त्यासाठी ते झटत होते. शहरातील वेगवेगळ्या समस्या सोवडण्यासाठी पाठपुरावा करत होते.

# अजितदादांची खणखणीत रॅली; मतदारांचा दणदणीत प्रतिसाद..!

## चिंचवड पोटनिवडणूक : नाना काटे यांना विजयी करण्याचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांची गर्दी... फुलांची उधळण... ढोल-ताशांचा गजर... फटाक्यांची आतषबाजी... बाईकवरून निघालेली तरुणाई... आणि अजित पवारांच्या खणखणीत आवाजात नाना काटे यांना विजयी करण्याचे आवाहन..! नाना काटे यांच्या विजयोत्सवाचा जणू ट्रेलरच चिंचवड मतदारसंघातील नागरिकांनी गुरुवारी संध्याकाळी अनुभवला!**

राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या प्रचारार्थ राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅली काढण्यात आली. यावेळी उमेदवार नाना काटे यांच्यासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पिंपळे गुरव ते जुनी सांगवी या भागातून काढण्यात आलेल्या या रॅलीत हजारोंच्या संख्येने नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. मतदारांची ही उत्स्फूर्त गर्दी पाहून विरोधकांना अप्रत्यक्षरीत्या सणसणीत चपराकच बसल्याची चर्चा रंगली होती.

रॅली सुरु असताना अनेक नागरिकांनी अजित पवार आणि उमेदवार नाना काटे यांना भेटून चिंचवडच्या विकासासाठी नाना काटे यांनाच साथ देणार, अशा भावना व्यक्त केल्या.



### परिवर्तनासाठी झालेली ही गर्दी...

अजित पवार यांनीही मतदारांना दिलासा दिला. ‘या भागाचा विकास करायचा असेल, तर विकासाची व्हिजन असणारा लोकप्रतिनिधी निवडून येणे आवश्यक आहे. नाना काटे यांच्याकडे तो व्हिजन आहे. त्यामुळेच त्यांना उमेदवारी दिली आहे. त्यांना विजयी करा. या भागाचा विकास तर करूच, शिवाय पाण्यापासून सर्व समस्या सोडवण्याची हमी मी देतो’, अशा शब्दात अजित पवार यांनी नागरिकांना आश्वस्त केले. सुमारे तीन हजार दुचाकीस्वार या रॅलीत सहभाग झाले होते. हा संदर्भ पकडून अजित पवार म्हणाले की, ‘ही पकडून आणलेली गर्दी नाही. ही परिवर्तनाची आस बाळगून आलेली जनता आहे. त्यामुळे स्वत:हून आलेली ही जनता नाना काटे यांना विजयी केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# आदर्श आचारसहितेचे काठेकोरपणे पालन!

## मतदान केंद्राच्या 100 मीटर अंतरातील दुकाने, टपऱ्या रविवारी बंद ठेवण्याचे आदेश

।पुणे। महाईन्यूज।

**कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत रविवारी (२६ फेब्रुवारी) मतदान प्रक्रिया पार पडणार असल्याने या दिवशी मतदान केंद्राच्या शंभर मीटर अंतरातील सर्व दुकाने, उपाहारगृहे, गाडे, टपऱ्या आणि सर्व आस्थापने बंद ठेवण्याचा आदेश पोलिसांनी काढला आहे. पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक यांनी काढलेल्या या आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. कसबा मतदारसंघातील निवडणुकीच्या हष्टीने १८ जानेवारीपासून आचारसंहिता लागू झाली आहे. रविवारी मतदान होणार असून २ मार्च रोजी मतमोजणी होणार आहे. निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू असेल.**

पुणे पोलीस आयुक्तालयाच्या समर्थ, फरासखाना, विश्रामबाग, खडक, दत्तवाडी या पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोटनिवडणूक होत आहे. ७६ मतदान केंद्रांवरील २७० बूथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत आणि शांततेत पार पडण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता आणि मालमत्तेला धोका पोहोचू नये यासाठी मतदान केंद्रांच्या शंभर मीटर परिसरातील सर्व दुकाने, उपाहारगृहे, गाडे, टपऱ्या आणि सर्व आस्थापने बंद ठेवण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाने घेतला आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघाचे मतदार नसलेल्या राजकीय व्यक्तीस किंवा राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्तीस या मतदारसंघात थांबता येणार नाही किंवा वास्तव्य करता येणार नाही.




### विजयी मिरवणुकीवर बंदी

**कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्न महामंडळाच्या (एफसीआय) येथील गोदामात २ मार्च रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीची प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडण्यासाठी गोदामाच्या परिसरातील दोनशे मीटर अंतरात सुरक्षा दल वगळता कोणासही शस्त्र बाळगता येणार नाही. या परिसरात मोबाइल, ध्वनिक्षेपक, वाहने यांच्या वापरावर प्रतिबंध असेल. मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकूर लिहिता येणार नाही. निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी मिरवणूक काढता येणार नाही, असे आदेश पोलिसांनी काढले आहेत.**

# कसब्यात मनसेला खिंडार, ५० कार्यकर्त्यांचे राजीनामे

## महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारात सहभागी

।पुणे।महाईन्यूज।

प्रतिनिधी।




कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा प्रचार केल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून सात कार्यकर्त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्यानंतर कसब्यात मनसेला खिंडार पडले आहे. कसबा विधानसभा मतदारसंघातील चाळीस ते पन्नास मनसैनिकांनी राजीनामा दिला असून, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

कसबा विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सध्या सुरू आहे. भारतीय जनता पक्षाचे हेमंत रासने आणि महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर यांच्यातच मुख्य लढत होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी न देता भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. मात्र मनसेचे कसबा विधानसभा मतदारसंघातील सात कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार केल्याने रवींद्र खेडेकर, सागर पांगारे, गोपी घोरपडे, अनिल चांदगे, रिझवान बागवान, प्रकाश ढमढेरे, नीलेश निकम यांची हकालपट्टी करण्यात आली होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वरिष्ठ नेते बाळा नांदगावकर, अनिल शिदोरे, राजेंद्र वागसकर यांच्या आदेशाने पक्षविरोधी काम करणाऱ्या या सर्वांची पक्षातून हकालपट्टी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्यानंतर कसबा विधानसभा मतदारसंघातील चाळीस ते पन्नास कार्यकर्त्यांनी राजीनामा दिला आहे. राजीनामा पक्षाच्या शहराध्यक्षांकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे कसब्यात मनसेला खिंडार पडल्याचे स्पष्ट झाले आहे. रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारफेरीमध्ये कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांवरती नजर ठेवून असलेल्या काही व्यक्तींनी राज ठाकरेंना माहिती पुरविली आणि रवींद्र खेडेकर आणि प्रकाश ढमढेरे यांच्यासह सात पदाधिकाऱ्यांना बडतर्फ केले.

# कलम ३७० ला विरोध करणाऱ्या लोकांमध्ये ही लढाई: देवेंद्र फडणवीस

## ही लढाई रासने-धंगेकर नव्हे तर..," कलम 370 चा उल्लेख करत फडणवीसांची पवारांवर टीका

।पुणे।महाईन्यूज।

प्रतिनिधी।

**कसबा आणि चिंचवड पोटनिवडणूक चुरशीची ठरत आहे. या जागा जिंकण्यासाठी महाविकास आघाडी तसेच भाजपा-शिंदे गटाकडून पूर्ण ताकदीने प्रयत्न केला जात आहे. मतदानाला फक्त दोन दिवस शिल्लक राहिल्यामुळे या पोटनिवडणुकीसाठी प्रचार मोहिमेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उडी घेतली आहे. त्यांनी आज कसबा मतदारसंघात प्रचारसभा घेत विरोधकांवर हल्लाबोल केला. चुकीचे कथानक रचण्याचा प्रयत्न केला तरी, त्याचा उपयोग होणार नाही. ही लढाई आता धंगेकर आणि रासने अशी नसून राष्ट्रीय विचाराचे आणि कलम ३७० ला विरोध करणाऱ्या लोकांमध्ये ही लढाई आहे, असे फडणवीस म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरही टीका केली.**

"हा जो कसबा आहे तो हिंदुत्ववादी आहे. हे पुणे छत्रपती शिवाजी महाराज यांचे आहे. शिवाजी महाराजांच्या पुण्यात देशभक्तांचा मेळा पाहायला मिळतो. मला विश्वास आहे की, कोणी कसेही कथानक रचण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. ही भाजपा-काँग्रेसची लढाई नसून ही रासने-धंगेकर अशी लढाई असल्याचे म्हणण्यात आले," असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.



लोकांमध्ये संभ्रम निर्माण करून लांगूलचालन करून निवडून येऊ, असा त्यांना विश्वास वाटतो. मात्र अठरापगड जातीचे लोक भाजपासोबत आहेत. कारण आम्ही छत्रपतींचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लहुजी साळवे, महात्मा जोतिबा फुलेंचा विचार सांगणारे आहोत. पुण्याच्या विकासाचा रथ भाजपा पुढे नेण्याचे काम करत आहे," असे म्हणत फडणवीसांना मतदारांनी भाजपाला मत द्यावे, असे आवाहन केले.

### राष्ट्रवादीच्या नेत्याने जातीवादी टिप्पणी

**"काल शरद पवार यांनी एक बैठक घेतली. याच बैठकीत त्यांच्या पक्षाच्या एका नेत्याने जातीवादी टिप्पणी केली. मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला हरवण्यासाठी देशभरातून मुस्लीम मतदाराला आणू. तसेच मेलेला मुसलमानदेखील येथे मतदान करायला येईल, असे हा नेता म्हणाला. हे जेव्हा सांगितलं जातं तेव्हा लक्षात घ्या, की ही लढाई धंगेकर किंवा रासने अशी नाही. ही लढाई राष्ट्रीय विचारांचे लोक आणि ज्यांचा काश्मीरला विरोध आहे, या लोकांमध्ये आहे," असे फडणवीस म्हणाले.**

### ही लढाई एका मतदारसंघाची असली तरी...

**"उद्या काँग्रेसचा उमेदवार निवडून येणारच नाही. मात्र काँग्रेसचा उमेदवार निवडून आलाच तर त्याला विचारा पुण्येश्वर महादेवबद्दल तुझी काय भूमिका आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीने त्यांची पुण्येश्वर महादेवाबद्दलची आपली भूमिका सांगितली पाहिजे. ही लढाई एका मतदारसंघाची असली तरी ही लढाई वैचारिक झाली आहे," असेही फडणवीस म्हणाले.**


# आता रात्रीस खेळ चाले!

## » प्रचाराचा तोफा आज थंडावणार : आचारसंहिता उल्लंघन केल्यास कारवाई

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूकीसाठी दि. २६ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रचाराचा कालावधी उद्या दि. २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता संपणार आहे. त्यामुळे मतदान होईपर्यंत सर्वपक्षीय नेते, पदाधिकाऱ्यांकडून “रात्रीस खेळ चाले” या पद्धतीने प्रचार होण्याची शक्यता आहे. मात्र, आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणूक आयोगाने लागू केलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणा-या व्यक्ती, संघटना तसेच राजकीय पक्षांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा निवडणुक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी दिला आहे.**




> मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेने सतर्क राहावे, आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यासाठी निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पथकांनी दक्षता घ्यावी.
> - **सचिन ढोले,** निवडणूक निर्णय अधिकारी.

मतदान बंद होण्याच्या ४८ तास अगोदर सुरु असलेला प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघाबाहेरून आलेले आणि त्या मतदारसंघाचे मतदार नसलेले राजकीय नेते इत्यादींनी त्या मतदार संघात उपस्थित राहू नये. अशा नेत्यांनी प्रचाराचा कालावधी समाप्त होताच तो मतदार संघ सोडावा. त्या मतदारसंघाचे मतदार नसले तरी सुद्धा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांना ही बाब लागू होणार नाही. केवळ निवडणुकीच्या कालावधीत राज्याचा प्रभारी असलेल्या पदाधिका-याच्या बाबतीत अशा निर्बंधाचा आग्रह धरला जात नाही. असा पदाधिकारी राज्य मुख्यालयातील आपले राहण्याचे ठिकाण घोषित करील आणि प्रस्तुत कालावधीतील त्याची ये-जा ही सामान्यपणे त्याचे पक्ष कार्यालय आणि त्याचे राहण्याचे ठिकाण यापुरतीच मर्यादित राहील.

उमेदवारास उद्या सायंकाळनंतर ४८ तासाच्या कालावधीत कोणत्याही जाहीर सभा आणि मिरवणुका आयोजित करता येणार नाही. तसेच मतदान संपेपर्यंत प्रसारमाध्यमांना जनमत चाचणी प्रसारित करण्यास प्रतिबंध असेल.

कोणत्याही जाहिराती किंवा प्रायोजित कार्यक्रम किंवा एखाद्या इराद्याने उमेदवाराला पाठिंबा देणारे किंवा टीका करणारे कोणतेही अहवाल निवडणुकीच्या निकालांवर प्रभाव टाकणारे किंवा प्रभावित करणारे कोणतेही अहवाल प्रतिबंधित असतील, निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या सूचनांप्रमाणे अपवादात्मक बाबी वगळता सर्व नियमांची अंमलबजावणी करण्यास निवडणूक विभाग कटिबद्ध आहे, असे सचिन ढोले यांनी सांगितले आहे. प्रचारासाठी लावण्यात आलेले फ्लेक्स, झेंडे, जाहिराती संबंधित उमेदवाराने काढून घ्यावे, तसेच कोणत्याही प्रकारे वाहनांद्वारे प्रचार करण्यास प्रतिबंध असेल, असेही ते म्हणाले. याबाबत पाहणी करुन योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना आचारसंहिता कक्षाला देण्यात आल्या आहेत, असे ढोले यांनी स्पष्ट केले आहे.

# येत्या २ मार्चला निकाल आपलाच!

## » राहुल कलाटेंचा विश्वास : मतदार संघातील प्रश्न अद्याप जैसे थे

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या शाळांमधील बहुतेक मुले वाहन चालक, शिपाई म्हणून काम करतात. दहावीनंतर ही मुले शिकू शकत नाहीत. त्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या ७०० च्या जागा ७ हजार करा, हे मी महापालिकेच्या प्रत्येक सर्वसाधारण सभेत सांगत आलो आहे. महापालिकेच्या इमारती मागची चार एकर जागा आम्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कामासाठी देऊ केली होती. पण, कालच मला एका अधिकाऱ्याने सांगितले की ती जागा आता अग्निशामक दलाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी ठेवतोय. मी त्यांना सांगितले तुम्ही २ मार्च पर्यंत थांबा. ती जागा आपण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेलाच घेऊ.', असा विश्वास अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी व्यक्त केला.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीतील अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ वंचित बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची रावेत येथे जाहीर सभा झाली. या सभेत कलाटे बोलत होते. त्यांचे निवडणूक चिन्ह शिट्टी आहे. यावेळी व्यासपीठावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




२०१४ ला मी शिवसेनेचा उमेदवार होतो. त्यावेळी तुम्ही मला ६५ हजार मते दिली. २०१९ ला या मतदारसंघात कोणीही लढायला तयार नव्हते. भाजपची मोठी लाट लोकसभेनंतर जाणवत होती. मला एक लाख १२ हजार मतांचे पाठबळ दिले. मला पाठिंबा दिलेले म्हणत आहेत कि ती मते आमची होती. परंतु, ॲड. प्रकाश आंबेडकर कधीही असे म्हणाले नाहीत कि ती मते आमची होती. ती मते जनतेची होती असेच ते म्हणतात. त्यामुळे त्यांच्याबरोबर नागरिक नाहीत. पण, आमच्याबरोबर आहेत. महापालिकेत पाच वर्षे गटनेता म्हणून काम केले. त्यावेळी प्रत्येक चुकीच्या कामाला कडाडून विरोध केला.

हे सर्व करण्यासाठी तुमच्यातील आमदार हवा. माझ्याबरोबर कोणता नेता नसला तरी माझ्याबरोबर नागरिक आहेत. भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसला जनता पोटनिवडणुकीत धडा शिकवेल आणि मला मोठा मताधिक्याने निवडून देईल, असा आत्मविश्वास अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी सभेत व्यक्त केला.

> पाणी, अनधिकृत बांधकामे, शास्तीकराचा प्रश्न दोन्ही पक्षांनी सोडविला नाही. माझ्यासमोरील दोन्ही उमेदवारांपैकी एकही जण पाच वर्षात कधी महापालिकेच्या स्मार्ट सिटीच्या विरोधात बोलल्याचे मला आठवत नाही. या परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता होती. आता भाजपची सत्ता आहे. मग कोणता प्रश्न सुटला? अनधिकृत बांधमकामाच्या प्रश्नावर सर्वजण सत्तेत आले. सुटला का तो प्रश्न ? ज्यावेळी प्राधिकरणाच्या जमिनी ‘ पीएमआरडीए’ मध्ये गेल्या. जो विकसित भाग आहे, तो महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला. आम्ही सांगत होतो कि हे हस्तांतर करताना संबंधित घरे नागरिकांच्या नावावर करा. पण आजही हा प्रश्न सुटलेला नाही.
> - **राहुल कलाटे,** अपक्ष उमेदवार.

### आमच्याबरोबर नागरिक आहेत

**»२०१४ ला मी शिवसेनेचा उमेदवार होतो. त्यावेळी तुम्ही मला ६५ हजार मते दिली. २०१९ ला या मतदारसंघात कोणीही लढायला तयार नव्हते. भाजपची मोठी लाट लोकसभेनंतर जाणवत होती. मला एक लाख १२ हजार मतांचे पाठबळ दिले. मला पाठिंबा दिलेले म्हणत आहेत कि ती मते आमची होती. परंतु, ॲड. प्रकाश आंबेडकर कधीही असे म्हणाले नाहीत कि ती मते आमची होती. ती मते जनतेची होती असेच ते म्हणतात. त्यामुळे त्यांच्याबरोबर नागरिक नाहीत. पण, आमच्याबरोबर आहेत.**

# भारताला आत्मविश्वास उंचावण्याची गरज!

**सेंट जॉर्जेस पार्क येथे झालेल्या साखळी सामन्यात इंग्लंडने भारताचा बारा धावांनी पराभव करून गटात आपले अव्वल स्थान निश्चित केले. शानदार सुरुवातीनंतर भारताने सामन्या वरची पकड ढिली केली. स्मृती मंधना आणि रिचा घोष यांना इतर फलंदाजांची साथ न मिळाल्याने भारताला पराभव पत्करावा लागला.**

सेंट जॉर्जेस पार्क येथे झालेल्या साखळी सामन्यात इंग्लंडने भारताचा बारा धावांनी पराभव करून गटात आपले अव्वल स्थान निश्चित केले. शानदार सुरुवातीनंतर भारताने सामन्या वरची पकड ढिली केली. स्मृती मंधना आणि रिचा घोष यांना इतर फलंदाजांची साथ न मिळाल्याने भारताला पराभव पत्करावा लागला.

सेंट जॉर्जेस पार्कच्या ढगाळ आणि ओलसर वातावरणात हरमन प्रीत ने नाणेफेक जिंकून अपेक्षाप्रमाणे प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. रेणुका ठाकुर ने उत्कृष्ट स्विंग गोलंदाजीचे प्रदर्शन करताना तीन बळी झटक्यात टिपले आणि हर्मानप्रीत चा निर्णय सार्थ ठरवला. काहीशा ओलसर खेळपट्टीवर शिखा पांडे आणि पूजा वस्त्रकर ने तिला तोलामोलाची साथ दिली. जलद गती गोलंदाजांनी इंग्लंडला अडचणीत आणले मात्र फिरकी गोलंदाजांनी नंतर निराशा केली. राजेश्वरी गायकवाड आणि राधा यादवची डावखुरी फिरकी अत्यंत प्रभावहीन ठरली. मध्येच शफाली वर्माला गोलंदाजी देण्याचा निर्णय चांगलाच अंगलट आला. इंग्लंडकडून नताली स्कवर ने पन्नास धावा तर अमी जोन्स ने चाळीस धावांचे बहुमूल्य योगदान दिले आणि इंग्लंडला दीडशे धावांचा टप्पा पार करून दिला.

एकशे बावन्न धावांच्या आव्हानासमोर स्मृती आणि शफाली ने जोरदार सुरुवात केली. मात्र धावांची गती वाढवण्याच्या नादात प्रथम शफाली नंतर जेमिमा आणि त्यानंतर हर्मानप्रीत अत्यंत खराब फटके मारून स्वस्तात बाद झाल्या. दुसऱ्या बाजूला स्मृतीने




**विशेष**
**सुनील शाळगावकर**
क्रिकेट प्रशिक्षक
9850217509

मात्र काही नजाकतदार फटके मारून धावफलक हलता ठेवला आणि अर्धशतक झळकावले. शेवटी आवश्यक धाव गती अवाक्य बाहेर गेल्याने मोठे फटके मारण्याच्या नादात तीही आपली विकेट गमावून बसली. रिचा घोष ने नेहमीप्रमाणे जबाबदारी ओळखून आक्रमक फलंदाजी ला सुरुवात केली, परंतु तोपर्यंत धावागती आवाक्या बाहेर गेली होती. तिचे शर्थीचे प्रयत्न अखेरीस अपुरे ठरले आणि भारताला बारा धावांनी पराभव पत्करावा लागला. इंग्लंडकडून विशेषतः फिरकी गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा करून भारतीय फलंदाजांना जखडून ठेवले.

बलाढ्य संघाविरुद्ध दबावाखाली भारतीय फलंदाजी कोलमडते हे आज पुन्हा एकदा दिसून आले. स्मृति मंधना आणि रिचा घोष चा अपवाद वगळता सर्वच फलंदाजांनी निराशा केली. भारताला विश्वचषक जिंकायचा असेल तर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड सारख्या बलाढ्य संघाविरुद्ध दबाव झुगारून कामगिरी करावी लागेल. मेघना ठाकूर आणि दीप्ती शर्मा चा अपवाद वगळला तर भारतीय गोलंदाजांना भरपूर सुधारणा करावी लागेल. फलंदाजीत शफाली वर्मा जमीमा रोड्रीग्स आणि हार्मनप्रीत यांना बलाढ्य संघाविरुद्ध निर्णायक योगदान द्यावे लागेल. भारताची लढत आता उपांत्य फेरीत बलाढ्य ऑस्ट्रेलिया विरुद्ध होण्याची शक्यता जास्त आहे. ऑस्ट्रेलियाला नमवण्यासाठी भारताला मानसिक कणखरता दाखवावी लागेल तसेच खेळही कमालीचा उंचावावा लागेल.

# आपला स्वार्थ आणि निसर्गाचा परमार्थ !

**लोकांचे हित,परमार्थ किंवा परोपकार या नैसर्गिक भावना असतात.व्यक्ती जन्माला येते तेव्हा हीच भावना घेऊन येते,लहान मूल म्हणूनच निरागस असते आपण त्याला देवाचे रूप म्हणतो कारण देवाजवळ विश्वाच्या कल्याणाची भावना असते. तो कुणाचेही अहित करीत नसतो,त्याला सगळे समान असतात असेच आपल्याला बालपणी शिकवले जाते.**

निसर्ग देवाचा एक भाग समजला जातो त्यामुळे निसर्गाच्या कोणत्याही घटकात हीच विश्वाच्या कल्याणाची भावना असते. ज्याने अनेकदा डेरेदार झाड कापले त्याच झाडाच्या सावलीत आश्रय घेणाऱ्याला झाड कधीही मना करीत नाही किंवा जात,धर्म,कर्म,लिंग असा कोणताही भेदभाव न करता झाड सगळ्यांना सामावून घेते. तेच धोरण जमीन,फळे,फुले किंवा पाण्याचे असते त्यांनीही स्वार्थी,खुनशी,बदमाश किंवा बलात्कारी व्यक्तीला दूर केल्याचे एकही उदाहरण सापडत नाही. थोडक्यात परमार्थ हा निसर्गाचा अन स्वार्थ हा मनुष्याचा स्थायीभाव असतो.मनुष्य उपकाराची परतफेड अनेकदा अपकाराने करतो मात्र निसर्ग आपल्याकडून कोणत्याही मदतीची अपेक्षा न ठेवताही हजार पटीने मानवाच्या हिताच्या गोष्टी त्याला देत असतो. मातीला योग्यवेळी एका दाण्याची केलेली मदत ती हजार दाणे करून मानवाला लाखो वर्ष झाले परत देत आली आहे. योग्यवेळी तुम्ही निसर्गाची काळजी घ्या,निगा राखा ,तो तुमच्या झोळीतही मावणार नाही एवढ्या संख्येत त्याची परतफेड करीत असतो. निसर्ग मानवाला काय देतो यापेक्षा काय देत नाही याची यादी करा म्हणजे कळेल की असे काहीच शिल्लक नाही जे निसर्गाने आम्हाला दिले नाही. तुम्ही त्याला उध्वस्त करण्याचा गेली हजार वर्ष विडा उचलला आहे, निसर्ग ओरबाडून असंख्य आजार,गंभीर व्याधी अन चैनीच्या जगण्याचा हव्यास करून पृथ्वीला महा संकटाच्या कड्यावर नेवून ठेवले आहे. कोणत्याही क्षणी पृथ्वीचा कडेलोट अन मानवाचा विनाश अश्या उंबरठ्यावर आपणच आपल्याला आणून ठेवले आहे. योग्यवेळी आपण झाडांची लागवड करीत नाही आणि मग अंग जाळणारा उन्हाळा आला की वाहन ठेवायला किंवा स्वतःला लपवायला गर्द सावलीचे झाड शोधावे लागते. झाडांचे महत्व समजून घ्यायला बरे झाले कुण्या देशात जाण्याची गरज नाही,आपली कोणतीही धार्मिक,सामाजिक पुस्तके उघडून बघा त्यात सगळी महती दिलेली असते पण आपण पडलो " दे रे हरी ,पलंगावरी " कोण आयते आणून देणार? लक्षात घ्या झाडांची मुळे ही निसर्गाची बिनखर्चाची पाईपलाईन असते. मोठी झाडे पावसाळ्यात लावली आणि त्याची योग्य काळजी घेतली तर भूगर्भातील पाण्याचा साठा सांभाळून ठेवण्याचे काम या झाडांची मुळे करीत असतात एक डेरेदार वृक्ष जमिनीत दरवर्षी किमान एकदिड कोटी लिटर पाणी आपल्या मुळांच्या माध्यमातून घेऊन जातो आणि भूगर्भात एक एकर परिघातील जागा ओलसर ठेवण्याचे काम करतात आपण मात्र हातभार जागेसाठी मोठ्या झाडांची बुंधे जाळून टाकण्यात धन्यता मानत असतो. ओसाड असणाऱ्या गावालगतच्या जमिनी आम्हाला गिळंकृत करण्यासाठी खुणावत असतात .त्या सरकारी किंवा धर्मादाय संस्थेच्या मालकीच्या असल्या तर त्यावर हिरवा पट्टा करण्याऐवजी आम्ही खडकाळ जमिनीत रूपांतर करण्यास मदत करतो अशावेळी एखादे झाड त्यावर लावले तर झाडाची मुळे हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहेत ,आतून जमीन ओलसर ठेवण्याचे भान त्यांना असते. एक कडूनिंबाचे झाड दहा हजार लिटर पाणी एकुण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते.याचा अर्थ आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब, चिंच, जांबळ, आंबा, मोह, अर्जुन या वर्गातील नक्कीच असतील. म्हणून मृत साठ्याचे पाणी पाझरत रहात असावे. याचा अंदाज येऊ शकतो. एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाड एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते.आणि ते ही पन्नास फुटाच्याही खाली. वडाची व पिंपळाची मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात. एक कोटी लिटर म्हणजे एका विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा मोठा निर्णय!

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश, MPSC चा नवा अभ्यासक्रम 2025 पासून लागू होणार

। मुंबई । महाईन्यूज ।

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक स्वरूपाच्या परीक्षेसंदर्भातील उमेदवारांची मागणी, कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व उमेदवारांना तयारीसाठी द्यावयाचा अतिरिक्त कालावधी विचारात घेऊन सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम 2025 पासून लागू करण्यात येत आहे. याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ट्विट करून माहिती दिली.**

एमपीएससीच्या नवीन शैक्षणिक पॅटर्ननुसार यंदाच्या वर्षापासून परीक्षा घेण्यास विद्यार्थ्यांनी विरोध करत पुण्यात आंदोलन सुरू केले. वेळोवेळी आंदोलन करूनही सरकारने दखल न घेतल्याने सोमवारी सकाळपासून बालगंधर्व चौकात विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या आश्वासनानंतरही विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले नाही. अखेर आज या विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश आले आहे.



### आयोग स्वायत्त आहे

लोकसेवा आयोगाच्या निर्णयावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, जी काही परिस्थिती निर्माण झाली होती. त्याबाबत आयोगासोबत चर्चा केली होती. यात आम्हाला कुठलेही राजकीय श्रेय घ्यायचे नाही. 'एमपीएससी'बाबतचा जुना निर्णय हा महाविकास आघाडी सरकारच्या काळात झाला होता. त्याचे खापर आमच्यावर फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा हिताचा निर्णय आता आयोगाने घेतला आहे. कोणी येणार, जाणार त्यानुसार निर्णय घेतले जात नाही. आयोग स्वायत्त आहे.

### शरद पवार यांनी घेतली होती भेट

**काल रात्री साडेअकरा वाजता विद्यार्थी आंदोलकांची राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी भेट घेतली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आयोग, विद्यार्थी प्रतिनिधींची घेण्याचे ठरले होते. ही बैठक आज नियोजित होती. मात्र बैठक रद्द झाल्याचे सांगण्यात येत होते. त्यानंतर आता बैठक न घेता आयोगाने आज विद्यार्थ्यांच्या बाजुने निर्णय दिला आहे**

### निवडणुकीचा रंग देऊ नका

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या घरी गुरुवारी दुसऱ्यांदा भेट दिली. एकनाथ शिंदे यांनी माध्यमांच्या प्रश्नाला उत्तर देताना टिळकांच्या घरी यायला विषय लागतो का? असा प्रति सवाल उपस्थित केला. भाजपच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या घरी दिलेल्या भेटीविषयी होत असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला. गणेशमंडळांच्या भेटींबाबत शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री आला कि, लोक भेटायला येतात. त्याला निवडणुकीचा रंग देऊ नका.**

# ठाकरेंना धक्का! शिवाजी पार्क मैदानातील धूळ नियंत्रणाचे कंत्राट रद्द

## मविआ सरकारच्या काळातील आणखी एक प्रकल्पाला धक्का

। मुंबई। महाईन्यूज ।

**दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानाच्या धुळीच्या प्रदुषणामुळे नागरिकांना श्वसानाच्या त्रासांचा सामना करावा लागला होता. मैदानातील धुळीचे प्रदुषण करण्यासाठी याठिकाणी मातीचा भराव घालून हिरवळ तयार करण्यात आली होती.**

तसेच हिरवळीच्या देखभालीसाठी तीन वर्षासाठी कंत्राटदाराचीही नेमणूक केली होती. परंतु हे कंत्राट आता महानगरपालिकेकडून रद्द करण्यात आले आहे. रद्द झालेले कंत्राट हे महाविकास आघाडी सरकारच्या काळातील आणखी एक प्रकल्पाला धक्का दिल्याचे बोलले जात आहे.



### तुषार सिंचन प्रणाली कार्यरत

**महानगरपालिकेच्या रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून विहिरीच्या पाण्याचा वापर हिरवळीवर करण्यात आला आहे. त्यासाठी पर्जन जलवाहिन्याही टाकण्यात आल्या आहेत. धुळीचे संकट कमी व्हावे तसेच संपूर्ण परिसरात हिरवळ आणि माती टिकून रहावी यासाठी संपूर्ण परिसरात तुषार सिंचन प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे.**

मैदानाची हिरवळ राखण्यासाठी पाणी मारण्यासाठी वर्षाला एक कोटी रूपये खर्च करण्याची आवश्यकता नाही, अशी सबब पालिकेकडून देण्यात आली आहे. त्याठिकाणी कंत्राटी कामगारांची मदत घेऊन मैदानावर पाणी मारत हिरवळ राखण्यासाठी यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून



विहिरीच्या पाण्याचा वापर हिरवळीवर करण्यात आला आहे. त्यासाठी पर्जन जलवाहिन्याही टाकण्यात आल्या आहेत. धुळीचे संकट कमी व्हावे तसेच संपूर्ण परिसरात हिरवळ आणि माती टिकून रहावी यासाठी संपूर्ण परिसरात तुषार सिंचन प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे.


मैदानातील समस्या तत्काळ सोडवता याव्यात तसेच मैदानातील साफसफाई आणि मेन्टेन्स यासाठी तीन वर्षाचे कंत्राट देण्यात आले होते. परंतु पालिकेने हे तीन वर्षाचे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

# शिंदेंच्या बंडानंतर ठाकरे गटाकडे बहुमताचा आकडा नाही!

।मुंबई। महाईन्यूज ।

राज्याच्या सत्तासंघर्षावर आज सलग तिसऱ्या दिवशी सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. आज सुनावणीच्या सुरुवातीलाच ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी राज्याच्या सत्तासंघर्षामध्ये राज्यपालांची भूमीका काय होती याबद्दल युक्तीवाद केला. जुने विधानसभ अध्यक्ष आणि नवे विधानसभा अध्यक्ष त्यांचे अधिकार आणि आमदार अपात्रतेबाबदचा त्यांचा निर्णय या सगळ्यांवर सिब्बल यांनी युक्तीवाद केला. तसेच राज्यपालांनी नियम डावलून शपथ दिली असेही सिब्बल म्हणाले.

या सर्व युक्तिवादानंतर सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, शिंदेंच्या बंडानंतर तुमच्याकडे बहुमताचा आकडा नाही. बंडखोरीनंतर सरकारच्या स्थैर्यावर परिणाम होतो. या घडामोडींकडे राज्यपाल दुर्लक्ष कसं करू शकतात? त्यावर सिब्बल म्हणाले, पण हा प्रश्नच इथे कुठे उद्भवतो. ३४ किंवा ३९ लोक राज्यपालांकडे जाऊन सत्तास्थापनेचा दावा कसा करू शकतात? राज्यपालांनी त्यांना शिवसेना म्हणून दर्जा दिला. केवळ दर्जाच दिला नाही, तर शपथही दिली आहे.



मविआकडे १२३ आणि अपक्षांचा पाठिंबा आहे. महाविकास आघाडीला अपक्षांचाही पाठिंबा आहे. घटनापीठाने हायपोथेटिकल आकडेमोडीवर जाऊ नये. आकड्यांपेक्षा राज्यपालांच्या भूमिकेवर लक्ष दिलं पाहिजे. त्यानंतर स्वतः सरन्यायाधीशांनीच आमदारांची आकडेमोड देखील यावेळी केली. शिवसेनेकडे ५५, काँग्रेस ४४ आणि राष्ट्रवादीकडे ५४ आमदार आहेत. भाजपकडे १०६ आणि इतरांचा पाठिंबा आहे.तर पुढे सिब्बल यांनी युक्तिवाद करताना म्हंटलं की, बहुमत चाचणीची मागणी होते, पण अपात्रतेचा निर्णय होत नाही. सरकार टिकवण्यासाठी तेव्हाच बहुमत चाचणी हवी होती. हा सगळा मोठ्या कटाचा भाग आहे. कटाचा भाग म्हणूनच गुजरात, आसामला गेले. राज्यपालांनी तुमचा पक्ष कोणता हा, प्रश्न तरी विचारायला हवा होता. तुमची कोणत्या पक्षाशी युती हेही विचारता आलं असतं. गोगावलेंची आसामध्ये बसून प्रतोदपदी नेमणूक केली गेली.

# पंजाबमध्ये पोलीस ठाण्यावर खलिस्तानी समर्थकांचा हल्ला!

## सहा पोलीस जखमी

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**पंजाबमधील अमृतसर येथे आज 'वारिस पंजाब दे' या संघटनेचा प्रमुख अमृतपाल सिंह याच्या समर्थकांनी अजनाला पोलीस ठाण्यावर हल्ला केला.**

पंजाबमधील अमृतसर येथे आज 'वारिस पंजाब दे' या संघटनेचा प्रमुख अमृतपाल सिंह याच्या समर्थकांनी अजनाला पोलीस ठाण्यावर हल्ला केला. या हल्ल्यात सहा पोलीस जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गेल्या आठवड्यात वारिस पंजाब दे या संघटनेच्या एका कार्यकरत्याला अटक करण्यात आली. तो निर्दोष असून पोलीस त्याचा जाणीवपूर्वक छळ करत असल्याचा आरोप सिंह याने केला आहे. तसेच त्याच्यावरील गुन्हा मागे न घेतल्यास पोलीस ठाण्याला घेराव घालण्याचा इशारा सिंह आणि त्याच्या समर्थकांनी दिला होता. त्यानुसार आज मोठ्या संख्येने सिंह यांच्या समर्थकांनी पोलीस ठाण्याला घेराव घातला.

यावेळी सिंह यांचे समर्थक आणि पोलीस यांच्यात बाचाबाची झाली. त्यानंतर हल्लेखोरांनी पोलीस ठाण्यात तोडफोड केली. यात ६ पोलीस जखमी झाले. याप्रकरणी अमृतसरचे एसएसपी यांनी सांगितले की अमृतपाल याने अटक करण्यात आलेल्या तुफान सिंह निर्दोष असल्याचे पुरावे दिले आहेत. यामुळे उद्या त्याला सोडण्यात येईल. तसेच याप्रकरणाच्या तपासणीसाठी विशेष समिती स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. अमृतपाल जरनैल सिंह भिंद्रावालेचा समर्थक आहे. त्याला खलिस्तानी समर्थक म्हणून ओळखले जाते. सप्टेंबर महिन्यात त्याला वारिस पंजाब दे या संघटनेचा प्रमुख बनवण्यात आले होते. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात अमृतसरमध्ये शिवसेना टकसाली अध्यक्षाची दिवसाढवळ्या हत्या करण्यात आली होती. त्यामागे अमृतपाल सिंहचा हात असल्याचे समोर आले होते.

### जर हिंदू राष्ट्राची मागणी केली जाऊ शकते मग खलिस्तानची का नाही

**» दरम्यान,यावर बोलताना अमृतपाल सिंह याने सांगितले की आम्ही शांतिपूर्ण मार्गाने खलिस्तानची मागणी करत आहोत. जर लोक हिंदू राष्ट्राची मागणी करू शकतात तर मग आम्ही खलिस्तानची मागणी का करू शकत नाही. दिवंगत पंतप्रधान इंदीरा गांधी यांनीही खलिस्तानला विरोध केला होता त्याची त्यांना मोठी किंमत मोजावी लागली होती. आम्हाला कोणीही रोखू शकत नाही. मग ते पंतप्रधान मोदी असो किंवा अमित शाह नाहीतर भगवंत मान. भारत हा लोकशाहीचा देश आहे. आमच्या पूर्वजांनी देश वाचविण्यासाठी आपल्या प्राणाचा त्याग केलाय. आम्हीही आमच्या धर्मासाठी आणि समाजासाठी बलिदान देण्यास तयार आहोत. असेही सिंह याने म्हटले आहे.**



# "ना संप होईल, ना बंगालचं विभाजन"!

## आंदोलनकर्त्यांना मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचा इशारा!

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।



पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा वेगळ्या गोरखालँडच्या मागणीने जोर पकडला आहे. वेगळ्या गोरखालँडच्या मागणीसाठी विनय तमांग यांच्यासह अनेकांनी २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी दार्जिलिंग परिसरात मेळावा बोलावला आहे. परंतु मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या मेळाव्यास विरोध केला. राज्य सरकार कोणत्याही संपाला किंवा मेळाव्यास परवानगी देत नाही, असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. त्या सिलीगुडी येथे जाहीर सभेत बोलत होत्या.

राज्यात कसलाही संप होणार नाही आणि पश्चिम बंगालचं विभाजनही होणार नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल. खरं तर, गोरखालँडच्या मागणीसाठी विनय तमांग यांनी २३ फेब्रुवारी रोजी दार्जिलिंगमध्ये २४ तासांच्या बंदची हाक दिली आहे. आपल्याला पश्चिम बंगालपासून वेगळं व्हायचं आहे, अशी मागणी त्यांनी केली. विशेष म्हणजे बंगालच्या विभाजनाविरोधातील सोमवारी विधानसभेत ठराव मंजूर करण्यात आला आहे.काही लोकांच्या मते जाती आधारीत भेदभाव आता दुर्मिळ झाला आहे. भारत सरकारने खालच्या जातीमधील विद्यार्थ्यांना आरक्षण देऊ केल्यामुळे अलिकडच्या वर्षात त्यातील अनेक विद्यार्थी हे पाश्चिमात्य देशांमध्ये नोकऱ्या मिळवत आहेत. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या की, राज्यात कोणताही संप होणार नाही. राज्य सरकार अशा कोणत्याही संपाला पाठिंबा देत नाही. दार्जिलिंग येथे बंदच्या नावाखाली अशांतता निर्माण करणाऱ्याला सूट दिली जाणार नाही. विकासासाठी नव्हे तर बंदच्या नावाखाली दार्जिलिंग परिसरात अशांतता निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला.

### राज्यात कसलाही संप होणार नाही

**»राज्यात कसलाही संप होणार नाही आणि पश्चिम बंगालचं विभाजनही होणार नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल. खरं तर, गोरखालँडच्या मागणीसाठी विनय तमांग यांनी २३ फेब्रुवारी रोजी दार्जिलिंगमध्ये २४ तासांच्या बंदची हाक दिली आहे. आपल्याला पश्चिम बंगालपासून वेगळं व्हायचं आहे, अशी मागणी त्यांनी केली. विशेष म्हणजे बंगालच्या विभाजनाविरोधातील सोमवारी विधानसभेत ठराव मंजूर करण्यात आला आहे.**

## महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावरील सर्वोच्च न्यायालयातील

# पुढील सुनावणी 28 फेब्रुवारीला होणार

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।



राज्याच्या सत्तासंघर्षात सलग तीन दिवस युक्तिवाद झाला. मात्र, अद्यापही फक्त ठाकरे गटाचाच युक्तिवाद सुरू आहे. त्यामुळे उर्वरित सुनावणी ही 28 फेब्रुवारी पासून सुरू होणार आहे. यावेळी ठाकरे गट आपला युक्तिवाद पूर्ण करेल आणि त्यानंतर मुख्यमंत्री शिंदेंची बाजू मांडण्यात येईल.

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सलग तीन दिवस सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनवणी आज संपली. याप्रकरणी आता पुढील सुनावणी 28 फेब्रुवारी रोजी होणार आहे. तीन दिवस झालेल्या सुनावणीत ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि अभिषेक मनू सिंघवी यांच्याकडून जोरदार युक्तिवाद करत अनेक कायदेशीर मुद्दे कोर्टात मांडण्यात आले.राज्याच्या सत्तासंघर्षात सलग तीन दिवस युक्तिवाद झाला. मात्र, अद्यापही फक्त ठाकरे गटाचाच युक्तिवाद सुरू आहे. त्यामुळे उर्वरित सुनावणी ही 28 फेब्रुवारी पासून सुरू होणार आहे. यावेळी ठाकरे गट आपला युक्तिवाद पूर्ण करेल आणि त्यानंतर मुख्यमंत्री शिंदेंची बाजू मांडण्यात येईल. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालय राज्यातील सत्तासंघर्षाच्या प्रकरणी काय निकाल देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर 21 फेब्रुवारीपासून सुनावणी सुरू असलेली सुनावणी आज संपली. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी तिनही दिवस ठाकरे गटाच्या वकिलांना युक्तिवाद करण्यासाठी वेळ दिला होता. विशेष म्हणजे याच आठवड्यात सुनावणी जारी राहील असे सर्वांना वाटत होते. परंतु, सरन्यायाधीशांनी अचानक सुनावणी पाच दिवस पुढे ढकलून 28 फेब्रुवारीला घेण्याचे निश्चित केले आहे.

### सलग तीन दिवस सुनावणी

**» 28 फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या सुनावणीवेळी शिंदे गटाच्या वकिलांना युक्तिवादासाठी तीन दिवसांचा कालावधी देण्यात येणार असल्याचे समजते. याशिवाय महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वकिलांनाही युक्तिवाद करायचा असल्यामुळं सुनावणीची वेळ आणखी वाढवली जाण्याची शक्यता आहे.**


# 'राज-कावेरी'ची लग्नघटिका समीप.. वऱ्हाडी म्हणून आले कलर्सचे तारे..

गेल्या काही आठवड्यांपासून 'भाग्य दिले तू मला' या मालिकेची प्रेक्षकांमध्ये प्रचंड चर्चा आहे. या मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात घर केलं. मालिकेचं कथानक आणि मालिकेचे कलाकार दोघांनीही प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यामुळेच काहीच महिन्यात ही मालिका प्रेक्षकांच्या मनावर राज्य करू लागली. त्यातही राज आणि कावेरी यांची जोडीही प्रेक्षकांची अत्यंत आवडती झाली आहे. ही मालिका सध्या उत्कंठावर्धक वळणावर येऊन पोहोचली आहे.

त्याचे कारणही तसेच आहे, राज आणि कावेरी यांचा विवाहसोहळा लवकरच पार पडणार आहे. अनेक संकटं पार करून अखेर राज आणि कावेरी एकत्र येणार आहेत. सध्या मालिकेत त्यांच्या विवाह सोहळ्याची धमाल सुरू असून येत्या 26 फेब्रुवारी रोजी ते विवाह बंधनात अडकणार आहेत.

NAVIN PRABHAKAR: 'पैचान कौन' फेम नवीन प्रभाकर याचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण..

राजने आपल्या प्रेमासाठी तात्यांनी दिलेली सर्व आव्हाने पार केली. तात्यांनी राजला चॅलेंज दिले होते की या गावात राहून दाखव कमवून दाखव... आणि ते राजने स्वीकारले आणि जिंकून दाखवले. त्यांनंतर आजीने देखील सानियाच्या सांगण्यावरून त्यांच्या नात्यात अनेक आव्हानं उभी केली पण त्यातूनही राज कावेरी लग्ना पर्यंत पोहोचले.



नुकताच त्यांच्या लग्नाचा मुहूर्त ठरला. येत्या 26 फेब्रुवारी ला ते विवाह बंधनात अडकणार आहे. सध्या त्यांच्या लग्नाची धामधूम सुरू झाली असून मेहंदी, हळद, संगीत असे सोहळे सुरू झाले आहेत.

विशेष म्हणजे या लग्नसोहळ्यात समस्त कलर्स परिवार सहभागी होणार आहे. नुकताच एक प्रोमो समोर आला. ज्यामध्ये 'शेतकरीच नवरा हवा' या मालिकेतील रेवा, 'सुंदरा मनामध्ये भरली'मालिकेतील लतिका. 'जीव माझा गुंतला' मालिकेतील अंतरा अशा सर्व अभिनेत्री

# 'एका मुलीसोबत बोअर होतो, म्हणून तर मला...'

बॉलीवूडचा भाईजान सलमान खान हा त्याच्या वेगळेपणासाठी नेहमीच चर्चेत असतो. त्याचा अंदाज हा इतर अभिनेत्यांपेक्षा वेगळा असल्यानं त्याच्या नावाला मिळणारी पसंती मोठी असते. सध्या सलमान हा त्याच्या किसी का भाई किसी की जान या चित्रपटामुळे चर्चेत आला आहे.

सलमानसोबत ज्या अभिनेत्रींनी काम केले त्यांनी नेहमीच त्याची स्तुती केली आहे. त्याच्यावर कौतूकाचा वर्षाव केला आहे. आता याला काही अभिनेत्री अपवादही आहेत. त्यांनी सलमानचा आक्रस्ताळेपणा, त्याचा आक्रमकपणा, चिडखोर वृत्ती, गर्विष्ठपणा यावर बिनधास्तपणे आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्यात त्याची मैत्रीण सोफी अली, ऐश्वर्या रॉय यांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. आता सलमानविषयी त्याची जुनी मैत्रीण मैंने प्यार किया फेम भाग्यश्रीनं जो खुलासा केला आहे तो भलताच धक्कादायक आहे. त्यामुळे सलमान पुन्हा एकदा लाईमलाईटमध्ये आला आहे. काही दिवसांपूर्वी एका पार्टीमध्ये सलमान आणि ऐश्वर्या एकमेकांना हात करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. तो सोशल मीडियावर प्रचंड हिटही झाला होता. यासगळ्यात नेटकऱ्यांनी त्या व्हिडिओवर दिलेल्या प्रतिक्रियाही भन्नाट होता.




# 'पैचान कौन' फेम नवीन प्रभाकर

गायक , अभिनेता आणि कॉमेडियन अशी आपल्या मनोरंजन क्षेत्रातील वाटचाल करून "पैचान कौन" म्हणणारी 'जुली - द बार गर्ल' आणि 'द ग्रेट इंडियन लाफ्टर' मधून घराघरात पोहोचलेला नवीन प्रभाकर आपल्या सर्वांना ठाऊक आहेच.पण आता लोकांना मनसोक्त हसवल्यानंतर आता मात्र "सोहम" चित्रपटाच्या निमित्ताने एका गंभीर भूमिकेत आपण नवीन प्रभाकर ह्यांना बघणार आहोत. 'सोहम' मधली भूमिका हि काहीशी आऊट ऑफ द बॉक्स संधी नवीन प्रभाकर ह्यांच्यासाठी आहे.

'कृतांत' सारख्या चित्रपटाचे दिग्दर्शन करणारे दत्ता मोहन भंडारे ह्यांचे दिग्दर्शन आणि संजय मंगेश बेहरे प्रदर्शित चित्रपट "सोहम" हि गुरुकुल शिक्षण पद्धतीवर अत्यंत सटीक मांडणी करणारी कथा आहे. गुरुकुल पद्धती कालबाह्य जरी झाली असली तरी ती शिक्षणाची किती प्रभावी पद्धत आहे ह्याचे उत्तम चत्रण ह्या चित्रपटाच्या निमित्ताने आपल्याला बघायला मिळणार आहे.

चित्रपटाबद्दल बोलताना नवीन प्रभाकर म्हणाले की , "कोरोना महामारीच्या काळात शिक्षणाचे डिजिटायझेशन झाले खरे पण हे डिजिटल शिक्षण 'शाप कि वरदान' असा प्रश्न हि पडलाच. इंग्रजी, हिंदी , मराठी मिडीयम च्या आधी गुरुकुल पद्धती होती जिथे विद्यार्थी 'शिष्य' आपल्या शिक्षकाकडे (गुरूकडे) जाऊन १२ वर्ष शास्त्र, शस्त्र, विद्या आणि योग अभ्यास करत असत. आत्ता शिक्षणाचे जे इंग्रजीकरण झाले आहे ही खंत म्हणायला हरकत नाही. कारण शेवटी तुम्ही काय शिकलात तुमच्यावर शिक्षणाने काय संस्कार झाले ते जास्त महत्वाचे आहे.' असे मला वाटते ."स्वामी काड सिद्धेश्वर महाराज आणि कोल्हापूरच्या कन्हेरी येथील अनेक विद्यार्थ्यांचे गुरुकुल असलेला सिद्धगिरी मठ अशी चित्रपटाची संकल्पना आहे. चित्रपटातील पिता हे मठाधीश असतात , अत्यंत कटाक्षाने त्यांनी मठाचे नियम पद्धती अंगिकारलेली असते. आणि स्वामी म्हणताच आज आपला जो काही समज आहे त्याला फाटा देऊन खरोखरीच किती निस्वार्थ सेवाधारी एखादा मनुष्य असू शकतो त्यांच्या कडून आपल्याला कित्तेक गोष्टी शिकायला मिळतात अशी ती पित्याची प्रतिमा साकारली गेली आहे. तर दुसरीकडे मुलगा (नवीन प्रभाकर) हा इंजिनियर असतो तो एका प्रतिष्ठित ठिकाणी नोकरी करतो आणि जेव्हा तो घरी जातो तेव्हा त्याच्या मुली आणि पत्नी त्याचे छान कुटुंब असा व्यक्ती चित्रित करण्यात आलं आहे.



# बोल्ड पोझ देऊन फसली दिशा पटानी..



अभिनेत्री दिशा पटानीचा हॉटनेस दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. काल-परवा अभिनेत्रीनं बाथरुममधनं ओल्या अंगात बाहेर येत बिकिनीतील एक फोटो शेअर केला होता आणि आता तिनं पुन्हा त्यातील काही फोटो शेअर करत सोशल मीडियावर खळबळ उडवून दिली आहे.दिशानं गुरुवारी २३ फेब्रुवारीला एका ब्रॅन्डला प्रमोट करताना काही बोल्ड फोटो शेअर केले आहेत. या फोटोत ती पॅंट हलकीशी खाली घेत पोझ देताना दिसत आहे.आता या फोटोमुळे दिशा पटानी ट्रोलर्सच्या निशाण्यावर आली आहे.रितेश कुकरेती नावाच्या इन्स्टाग्रामवरील नेटकऱ्यानं दिशा पटानीला ट्रोल करत तिच्या पोस्टवर कमेंट केली आहे की,'यामध्ये पॅंट उतरवायची काय आवश्यकता होती. तसंच सांगायचं काय घातलंय ते...',तर आणखी एका युजरनं उर्फीचा उल्लेख करत लिहिलं आहे की-'उर्फीला टक्कर देतेय'. याव्यतिरिक्त एका यूजरनं निशाणा साधत लिहिलं-'हिला अभिनय सोडून सगळं येतं'.दिशा पटानीच्या सिनेमांविषयी बोलायचं झालं तर तिला शेवटचं अर्जून कपूर,जॉन अब्राहमसोबत 'एक व्हिलन रिटर्न्स..' मध्ये पाहिलं गेलं होतं. अर्थात हा सिनेमा बॉक्सऑफिसवर फार काही कमाल दाखवू शकला नव्हता.

# ऑस्ट्रेलियाने भारताच्या आशांवर फेरले पाणी!

## 5 धावांनी विजय नोंदवून मिळवले फायनलचे तिकीट, 20 षटकांत 4 बाद 172 धावा

**। दुबई ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेतील पहिला सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात खेळला गेला. न्यूलँड्स येथील केप टाउन स्टेडियमवर झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर ५ धावांनी विजय मिळवला. भारतीय महिला क्रिकेट संघाचे टी-२० विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे. त्याचबबरोबर ऑस्ट्रेलियाने मोठ्या दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली. ऑस्ट्रेलियन संघाकडून बेथ मूनीने सर्वाधिक ५४ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर मेग लॅनिंग नाबाद ४९ धावांचे योगदान दिले.**




या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ४ बाद १७२ धावा केल्या. त्यामुळे भारतीय संघाला १७३ धावांचे लक्ष्य मिळाले होते. प्रत्युत्तरात भारतीय संघ २० षटकांत ८ बाद १६७ धावाच करु शकला. टीम इंडियाने मेग लॅनिंग आणि बेथ मुनी यांचे सोपे झेल गमावले. त्याचा परिणाम असा झाला की मुनी आणि लॅनिंगने मोठी खेळी खेळली. मुनीने ३७ चेंडूत ५४ धावांची खेळी केली. याशिवाय लॅनिंगने कर्णधारपदाची खेळी खेळताना ३४ चेंडूत नाबाद ४९ धावा केल्या. ॲशले गार्डनरने १८ चेंडूत ३१ धावांची खेळी खेळली.प्रत्युत्तरात भारतीय संघाला २० षटकांत आठ गडी गमावून १६७ धावा करता आल्या. एका टप्प्यावर भारताने १४ षटकांत ४ गडी गमावून १२४ धावा केल्या होत्या. त्यानंतर टीम इंडियाला ३६ चेंडूत ४९ धावांची गरज होती. भारतीय संघ हा सामना सहज जिंकेल असे वाटत होते. कर्णधार हरमनप्रीत कौर ३० चेंडूत ४३ आणि ऋचा घोषने १४ धावा केल्या.

यानंतर पुढील षटकात हरमनप्रीतने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्याच षटकात ती विचित्र पद्धतीने धावबाद झाली. हा सामन्याचा टर्निंग पॉइंट ठरला. एक धाव घेतल्यानंतर दुसरी धाव घेताना ती बॅट क्रीजमध्ये ठेवायला विसरली. तिला ३४ चेंडूत ५२ धावा करता आल्या.हरमनप्रीत बाद होताच पुढच्याच षटकात खराब शॉट खेळून रिचाही बाद झाली.

१९व्या षटकात स्नेह राणा बाद झाल्याने भारताच्या आशा संपुष्टात आल्या. शेवटच्या षटकात विजयासाठी १६ धावांची गरज होती. त्यानंतर दीप्ती शर्मा आणि राधा यादव क्रीजवर होते. मात्र, टीम इंडियाला केवळ १० धावा करता आल्या आणि पाच धावांनी सामना गमवावा लागला. हरमनप्रीतशिवाय जेमिमाने २४ चेंडूत ४३ धावांची खेळी केली. शफाली वर्मा, स्मृती मंधाना आणि यास्तिका भाटिया या स्टार्स अपयशी ठरल्या. ॲशले गार्डनरने दोन बळी घेतले. तिला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

# सेमीफायनलपूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का!

## कर्णधार हरमनप्रीत अन् पूजा बाहेर?

**।मुंबई ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**महिला टी-20 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीपूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसु शकतो. दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊनमधून बातमी येत आहे की हरमनप्रीत कौर आणि पूजा वस्त्राकर उपांत्य फेरीत खेळणार नाहीत. मात्र याबाबत संघ व्यवस्थापनाकडून अद्याप कोणतेही वक्तव्य आलेले नाही. परंतु सूत्रांवर विश्वास ठेवला तर, या दोन्ही खेळाडूंच्या आज ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत खेळण्यावर सस्पेंस आहे.**

उपांत्य फेरीपूर्वी भारतीय संघाने नेटवर चांगलाच घाम गाळला. त्यावेळी ही केपटाऊनमध्ये दोन्ही खेळाडू त्यांच्या बाकीच्या सहकाऱ्यांसोबत सराव करताना दिसले नाहीत. आता सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या दोघांच्या खेळाबाबत शंका आहे.

हरमनप्रीत कौरची महिला टी-20 विश्वचषकाच्या गट टप्प्यातील कामगिरी बॅटने फारशी चांगली राहिली नाही.

त्याने 4 सामन्यात केवळ 66 धावा केल्या, पण त्याच्या नेतृत्वाखाली संघाने 4 पैकी 3 सामने जिंकले आहेत. याशिवाय हरमनप्रीत कौरला आयसीसी नॉकआऊट सामन्यांमध्येही खेळण्याचा अनुभव जास्त आहे. अशा स्थितीत उपांत्य फेरीत ती न खेळल्यास भारतासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात.






# विश्वचषक नेमबाजी स्पर्धा: ऐश्वर्य सिंग तोमरला सुवर्ण

**। कैरो । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सलग चौथ्या दिवशी भारतीय नेमबाजांनी आपले वर्चस्व राखले. स्पर्धेत चौथ्या दिवशी बुधवारी ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात भारताच्या ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरने सुवर्णपदक पटकावले. भारताचे स्पर्धेतील हे सहावे पदक होते. यामध्ये चार सुवर्ण, एक रौप्य आणि एका कांस्यपदकाची समावेश आहे. भारत पदकतालिकेत आघाडीवर आहे.

भारताच्या २२ वर्षीय ऐश्वर्यने गेल्यावर्षी देखील विश्वचषक स्पर्धेत सोनेरी यश मिळवले होते. यावेळी अंतिम लढतीत ऐश्वर्यने ऑस्ट्रियाच्या ॲलेक्झांडर श्मिर्लचा १६-६ असा पराभव केला. त्यापूर्वी, मानांकन फेरीत ४०६.४ गुणांसह ऐश्वर्यने दुसऱ्या क्रमांकाने सुवर्णपदकासाठी श्मिर्लला आव्हान दिले. श्मिर्ल ४०७.९ गुणांसह सर्वप्रथम अंतिम फेरीत दाखल झाला होता.त्यापूर्वी, पात्रता फेरीत ऐश्वर्यने ५८८ गुणांसह आघाडीच्या क्रमांकाने मानांकन फेरीत प्रवेश केला होता. पात्रता फेरीत भारताचा अखिल शेरॉन ५८७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर होता. मात्र, मानांकन फेरीत अखिल आव्हान राखू शकला नाही.

